# लोहमार्ग पोलिसांची कामगिरी

# अकरा महिन्यांच्या बालकाची अपहरणकर्त्यांच्या तावडीतून सुटका



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहल्यानगर–** अकरा महिन्यांच्या बालकाचे अपहरण करणा–या तीन आरोपींना लोहमार्ग पोलिसांनी अटक करून बालकाची त्यांच्या तावडीतून सुखरूप सुटका केली. या कामगिरीबद्दल लोहमार्ग पोलिसांचे कौतुक होत आहे.

याबाबतची माहिती अशी की, दि. १६ जून रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास नगर रेल्वेस्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील एटीएम केबीनच्या समोरील लिंबाच्या झाडाखालून फिर्यादी अमृता आकाश खडसे (वय २३ वर्षे, धंदा मजुरी, रा. मु पो तोंडगाव ता. जि. वाशिम) हिच्या बाळाचे एका अनोळखी महिलेने अपहरण केले. या महिलेने (वय अंदाजे ३५ ते ४०) सुरुवातीला बालकाच्या आईशी जवळीक साधून ओळख वाढवली. नंतर जेवणाकरिता वरणभात घेऊन येते अशी बतावणी करून तिचे अकरा महिन्यांचे बाळ स्वानंद आकाश खडसे यास पळवून नेले होते. ही अनोळखी महिला बाळास घेऊन परत आलीच नाही म्हणून बाळाच्या आईने अहमदनगर लोहमार्ग पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली. त्यावरून भादंवि कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक संजय लोणकर हे करीत असताना गोपनीय खब–यामार्फत त्यांना हा गुन्हा केलेले आरोपी हे सुपा परिसरात असल्याची माहिती मिळाली. लोहमार्ग पोलिसांनी सुपा परिसरातून अनिल अशोक जाधव (वय ४१ वर्षे, रा. अमित मोटर्स पाठीमागे, सुपा, ता. पारनेर, जि. नगर), नवनाथ विष्णू धोत्रे (वय ३३ वर्षे, रा. गुंजाळवाडी, ता. संगमनेर, जि. नगर) व सौ. शालन अनिल जाधव (वय ३८ वर्षे, रा. अमित मोटर्स पाठीमागे, सुपा, ता. पारनेर, जि. नगर) यांना शिताफीने ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबूल केले. त्यांच्या तावडीतून अपहरण केलेले बालक स्वानंद आकाश खडसे याची सुखरूप सुटका करण्यात आली.

सदरची कारवाई लोहमार्ग पोलीस पुणेचे अधीक्षक तुषार दोषी, उपविभागीय पोलीस अधिकारी महेश देवीकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोहमार्ग पोलीस उपनिरीक्षक संजय लोणकर, हवालदार सर्फराज खान, हवालदार बाबासाहेब गवळी, पोना इरफान शेख, पोशि रविंद्र देशमुख, पोशि अविनाश खरपास, पोशि आसाराम येवले, पोशि किरण तोरडमल, पोशि प्रकाश गडाख, पोशि गोरक्ष नवले, मपोशि वनिता समिंदर, मंगल आहेर, होमगार्ड साबिर शेख व होमगार्ड मंदार सटाणकर यांनी केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संजय लोणकर हे करीत आहेत.